# ।। बिस्वास को अंग ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

## ।। अथ बिस्वास को अंग लिखंते ।।

।। सवईयो इंद व छंद ।।

तेरे किये कछु होवत नाही ।। सोच करे किम जीव अग्यानी ।।
कीडी कुं कण दिये मण कुंजर ।। देहे को संग सो चिठी लिखानी ।।
हंस कूं मोती दिये सिंघ माटी ।। आग चिकोर निते उठ ठानी ।।
सोच विचार कहे सुखदेव जी ।। ग्यान बिचार रहो सुखमानी ।।१।।

(सतगुरु सुखरामजी महाराज,मनुष्यास विश्वास ठेवण्याबद्दल सांगतात.)अरे,तुझे केलेले काहीच होत नाही,अरे अज्ञाना,तु फिकीर कशाकरीता करतोस,अरे,तो सर्वांस खाण्यास देतो,(तो ज्याचा-ज्याचा,जसा-जसा आहार आहे,तसा-तसा त्याप्रमाणे)मुंगीस कण कोण देतो,तर हत्यास मण देतो,त्याने जसा जसा देह(शरीर)दिला आहे,तसा त्या देहाप्रमाणे त्यास आहार मिळण्याकरीता,ज्यादिवशी देह दिला त्याच दिवसी,त्या देहाच्या सोबतच आहार मिळण्याची चिठ्ठी लिहून दिली,(त्या लिहिलेल्या चिठ्ठीत तू कितीही उपाय केले,तरी कमी जास्त काही होवू शकत नाही).पहा राजहंस आहे तो मोतीच खात असतो,(त्या हंसाचा एक दिवसाचा चारा,एक लक्षपती सावकाराची इस्टेट, त्याच्या(लक्षपती सावकाराच्या)वाड वडिलाने कमावून इस्टेट,त्या हंसाचा एक दिवसाचा चारा खाण्यास पुरणार नाही,जर हंस म्हणेल,मी रुपये कमावून मोती विकत घेऊन खाईल, तर तो आपल्या खाण्यापुरते रुपये कमावू शकेल काय,तर त्यालाही खाण्याकरीता) मोती पुरविणारा पुरवितो,(मग तुम्हास उपासी ठेवील काय)व सिंह आहे तो मांस खातो, (सिंह गवत,भाकरी,किंवा फळ फळावळ खात नसतो,तर त्यास(सिंहास))मांसही खाण्यास वेळच्या वेळी देतो.(असली सिंह आहे,तो मेलेल्या प्राण्याचे मांस खात नसतो, तो ज्या जनावरास धरतो,त्या जनावरांत जे ते जनावर पायाने तडफड करते,तोपर्यंत सिंह त्यास खातो,त्या प्राण्याचा जीव निघाल्यावर तसाच टाकून निघून जातो.)चकोर पक्षी आहे,तो नित्य उठून,अग्नीच खात असतो,तर त्याला देखील वेळच्या वेळी खाण्यास अग्नी देत असतो,(मग तुम्हास अन्न देणार नाही काय).आदि सतगुरु सुखरामजी महाराज, विचार करुन सांगतात,असा ज्ञानाचा विचार करुन तुम्हीही सुख मानून रहा. ।।१।।

अनड़ आकास जो सेंस धर हेटे ।। इजगर कूं राम देहे भख आनी ।।
मुनिसो रिष गुफा बन तापे ।। ताहि की गम लहे हर जानी ।।
जुग सो जान अनंतर हुवा ।। चून दयाल दियां हर जावे ।।
लानत तोह कहे सुखदेवजी ।। जीव की द्रिढता तोय न आवे ।।२।।

अनड पक्षी जो आकाशात राहतो,तर त्याला देखील खाण्यास तेथेच पोहचवित असतो, (अनड पक्षी आकाशांतच रहात असतो,तो(अनड पक्षी)खाली पृथ्वीवर केव्हांही बसत

नाही,तो पृथ्वीपासून इतक्या ऊंचीवर आहे की,त्याची मादी अंड देते ते अंड खाली पृथ्वीवर पडत असताना,रस्त्यातच पकून व फुटून पृथ्वीवर पडण्याच्या पुर्विच,त्या पिलास पंख येऊन उडण्या योग्य होऊन जातो,ते पिल्ल आपल्या खाण्याकरीता हत्यास घेऊन उडून जाते,ते पुन्हा पृथ्वीवर केव्हांही येत नाही असे म्हणतात),तर त्यासही तेथे वरच्यावर खाण्यास देत असतो व शेष पृथ्वीच्या खाली आहे,त्यासही खाण्यास पुरवितो व अजगर जागच्या जागीच पडले राहतात,(त्यास(अजगरास)भक्ष शोधण्या करीता कोठेही चालता येत नाही व जवळ आलेल्या जनावरास,झडप घालून धरीत ही नाही,ते अजगर फक्त तोंड वासून पडले राहतात),त्याच्या तोंडात भक्ष आपोआप येऊन पडते.मुनी व ऋषी वनांत गुंफेत पहांडात बसले राहतात,त्याचीही खबर तो घेऊन त्यांनाही उपाशी ठेवीत नाही.आपल्याला(सर्व जीवांना)अनंत युगे झाली,तरी तो दयाळ आपल्यास येऊन,दररोज खाण्यास देऊनच राहिला आहे,आदि सतगुरु सुखरामजी महाराज म्हणतात,अरे,जीव तुला लानत आहे,तुला अजून त्यांचा पक्का मजबूत भरंवसा येत नाही. ।।२।।

**ऊठत धांह पुकारत डोले ।। कोन भरे नर पेट जमेरो ।।**
**त्रिस्ना तोख लियां गळ डोले ।। माया के संग रहे नित चेरो ।।**
**आठ मास नव गर्भ मे दीया ।। काहा धन संग कहा जुं डेरो ।।**
**सोच बिचार कहे सुखदेवजी ।। गोऊँ चाबे सोई सीचे हे बेरो ।।३।।**

तूं पहाटेस उठल्याबरोबर बोंबलत फिरतो व म्हणतो माझे पोट कोण भरेल,तू तृष्णेची तोख(एक फार भारी लोखंडाला साखळी बांधून,पूर्वि ज्यास फार भारी सजा द्यावयाची असेल,त्याच्या गळ्यांत घालीत असत,त्यास तोख म्हणतात.तोख लहान मोठी असे, मोठी तोख पन्नास–पन्नास मण वजनाची असे,अशी तृष्णेची तोख)गळ्यांत घालून या मायेच्या सोबत,मायेचा गुलाम होऊन फिरुन राहिला आहे,अरे,तू ज्यावेळी आईच्या गर्भात होता,तेथे आठ नऊ महिने तुला खाण्यास आणून दिले,तेथे गर्भामध्ये तुझ्या सोबत काय धन होते व खाण्याकरीता काय सामान होते,तेथे(गर्भात तूं काय उद्यम कमाई करुन आणून खात होता,ज्यावेळी तुला एक बोटभरही,इकडे–तिकडे होता येत नव्हते,त्यावेळीही तुला तेथे ज्याने खाण्यास पोहचविले व जन्म घेतल्यावर तुला दांत नव्हते,त्या तुझ्या जन्मण्याच्या तीन महिने पूर्वि,आईच्या स्तनांत दूध उत्पन्न केले व मागाहून दांत झाल्यावर तुला अन्न देऊ लागला,त्यावेळी तूं कमाई तर करु शकत नव्हता, अशा अपंग अवस्थेत तुला खाण्यास दिले,अरे,जीव ते पहा,जंगलात पहाडात झाडे आहेत,ते(झाडे)जन्मल्या–दिवसापासून,एकाच ठिकाणी उभे आहेत,ते कोठेही उद्यम करण्यास जात नाही व एक बोटही इकडच्या तिकडे सरकूं शकत नाही,जन्मल्या

दिवसापासून,एक ठिकाणीच उभे आहेत,त्यांनाही तो तेथे जागच्या जागी जगवितो. मारवाड देशात पुष्कळ ठिकाणी,अडीचशे तीनशे–तीनशे हात विहीरी खोल आहेत,ज्या ठिकाणी तीनशे हात खोलपर्यंत पाण्याचा पत्ता नाही,त्या देशातील जंगली झाडे कसे जगत असतील,ती झाडे उन्हाळ्यांत देखील,हिरवीगार असून त्यास फळे येतात.केर व सांगरीस उन्हाळ्यांत फळे येतात,तर त्या झाडास फळे,फुले येण्यास रस कोठून येत असेल,वरुन उन्ह पड्ते व खालून जमीन तापते,अशा वेळी निंब वगैरे झाडास, मारवाड देशांत निंबोळ्या येतात व अनोप देशांत आंबे,जांभूळ वगैरे फळे उन्हाळ्यांत रसदार कसे उत्पन्न होत असेल,आंबे,जांभूळ हे बागायती झाडे नसून,वरच्या पाण्यावरच होतात, हे झाड असो.परंतु बोरीच्या झाडाला कोसला लागलेला असतो,त्या कोसल्याचे लोक हातात धरण्याचे काडीस बंध वगैरे बांधत असतात,त्या कोसल्यात एक जनावर असते, त्या कोसल्याला सुई मावे इतकेही कोठेही छिद्र नसते,तर तो त्या कोसल्यातील किडा काय खात असेल,त्या कोसल्यात त्या जनावराची तो खबर घेऊन,त्यांत त्याला पोहोचवितो,यात अचंबाची गोष्ट ही की,त्या कोसल्यात त्याला कोणत्या मार्गाने पोहचवितो,याचा काही पत्ता लागत नाही,मग आपण तर चालते फिरते बोलते व हाताने काम करणारे असे आहो).आदि सतगुरु सुखरामजी महाराज विचार करुन सांगतात, ज्यांनी गहू पेरले आहे,ते त्या गव्हाला विहीरीचे पाणी काढून,आपोआप पाणी देणारच, पाणी देणारा जसा पाणी चुकूं देत नाही,तसा तोही सर्वांना देतो,(कारण त्याचे नांव विश्वंभर आहे,तो विश्वाचे भरण पोषण करतो,म्हणून त्याला विश्वंभर म्हणतात.) ।।३।।

।। इति बिस्वास को अंग संपूरण ।।